संपादक / रिपोर्टर,
पुढारी,
मुंबई

विषय - 27 फेब्रुवारी 2020 रोजी "संरक्षक भिंतीच्या प्रतीक्षेत मीठी नदी" या बातमीबदद्ल खुलासा

आदरणीय महोदय,

आपल्या दिनांक २७/०२/२०२० च्या दैनिका मध्ये "माय पुढारी" पुरवणीच्या पानावरील"संरक्षक भिंतीच्या प्रतीक्षेत मीठी नदी" या शीर्षका खालील बातमी प्रसिद्द करण्यात आली आहे. सदरची बातमी वस्तुस्थितीला अनुसरून नाही. सदरची भिंत बांधण्याची कार्यवाही बृहन्मुम्बई महानगरपालिकेत कडून करणे अपेक्षित आहे. याबाबत बृहन्मुम्बई महानगरपालिका यांनी दिनांक 11/10/2019 रोजी झालेल्या बैठकीत प्राधिकरणाच्या क्षेत्रातील भिंत बांधण्यास सहमती दर्शविली होती.

विहार तलाव ते सीएसटी पुलापर्यंत मिठी नदीचा १२ किमी लांबीचा भाग बृहन्मुम्बई महानगरपालिकाअखत्यारीत येतो, तर उर्वरित ६ किमीचा हा भाग एमएमआरडीएचा आहे. 6 किमीच्या ( सीएसटी ब्रिज ते माहिम कॉज़वे) या भागात प्राधिकरणाकडून 500 मीटर लांबी वगळता उर्वरित भिंत बांधली आहे. प्रस्तुत प्रकरणात सदर कामाला स्थगिती देण्यात आल्याने पूर्ण करतात आली नाही.

बृहन्मुम्बई महानगरपालिका आणि एमएमआरडीए यांच्यात कोणताही गैरसमज नाही.

सबब आपणास विनंती करण्यात येते कि प्राधिकरणाशी संबंधित बातमी प्रकाशित करण्यापूर्वी प्राधिकरणाचे मत विचारण्याबाबत संबंधित वार्ताहरांना आपले स्तरावरून निर्देश द्यावेत जेणेकरून प्राधिकरणाची प्रतिमा मलीन होणार नाही.

डॉ. बी. जी. पवार
सह महानगर आयुक्त
एमएमआरडीए